# CRISIL LIMITED

CRISIL
An S&P Global Company

**Regd. Office:** CRISIL House, Central Avenue, Hiranandani Business Park, Powai, Mumbai - 400 076
**CIN:** L67120MH1987PLC042363
**Tel.:** 022-33423000; **Fax:** 022-33423001
**Website:** www.crisil.com; **E-mail:** investors@crisil.com

## NOTICE OF POSTAL BALLOT

Members are hereby informed that pursuant to Section 110 of the Companies Act, 2013, read with the Companies (Management and Administration) Rules, 2014, General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020, No. 17/2020 dated April 13, 2020, No. 22/2020 dated June 15, 2020, No. 33/2020 dated September 28, 2020, No. 39/2020 dated December 31, 2020, No. 02/2021 dated January 13, 2021 and No. 10/2021 dated June 23, 2021 issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA Circulars"), and other applicable provisions, including any statutory modification or re-enactment thereof for the time being in force, CRISIL Limited (the "Company") seeks approval of Members for appointment of Mr. Amish Mehta as a Managing Director & Chief Executive Officer of the Company with effect from October 1, 2021 and the terms and conditions of his appointment, as detailed in the Postal Ballot Notice dated August 12, 2021.

The Company has on August 21, 2021 completed the dispatch of the Postal Ballot Notice to the Members whose names appear on the Register of Members/List of Beneficial Owners as received from the National Securities Depository Limited (NSDL) and Central Depository Services (India) Limited (CDSL) at their registered email ids. As a voluntary gesture without there being a requirement in this regard in terms of the aforesaid circulars, the Company has sent a print copy of the Notice to the registered postal address of Members who have not registered their email addresses so far. Members whose names appeared on the Register of Members/ List of Beneficial Owners as on Tuesday, August 17, 2021 i.e. the cut-off date, will be considered eligible for the purpose of voting. A person who is not a Member as on Tuesday, August 17, 2021 i.e. the cut-off date for reckoning voting rights, should treat this Notice for information purposes only. In accordance with the above mentioned Circulars, Postal Ballot forms and Business Reply Envelopes have not been sent to the Members. The communication of the assent or dissent of the Members would take place through the remote e-voting system only.

Members holding shares in dematerialised mode are requested to register/update their email addresses with the relevant Depository Participants. Members holding shares in physical mode are requested to update their email addresses with the Company's Registrar and Share Transfer Agent (RTA), KFin Technologies Private Limited at einward.ris@kfintech.com with a copy to investors@crisil.com sending a scanned copy of the signed request letter mentioning their Folio No., name, scanned copy of the share certificate (front and back), PAN (self-attested scanned copy of PAN card), AADHAR (self-attested scanned copy of Aadhar card) for registering email address.

In compliance with provisions of Section 110 of the Act read with Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company is offering remote e-voting facility to the Members of the Company. The Company has entered into an arrangement with National Securities Depository Limited ("NSDL") for facilitating remote e-voting services. The login credentials for casting the votes through remote e-voting have been sent to the shareholders along with the Notice of Postal Ballot. The detailed procedure for casting of votes through remote e-voting has been provided in the Notice. The details will also be made available on the website of the Company.

The remote e-voting period shall commence on Tuesday, August 24, 2021 at 9.00 a.m. and end on Thursday, September 23, 2021 at 5:00 p.m. Members may cast their vote electronically during the aforesaid period. The remote e-voting module shall be disabled at 5.00 p.m. on September 23, 2021 and remote e-voting shall not be allowed beyond the same.

The Board of Directors has appointed Mr. Makarand Joshi, Practising Company Secretary, as the Scrutiniser for conducting the Postal Ballot process in a fair and transparent manner. The results of the Postal Ballot will be announced on Friday, September 24, 2021. The result would be intimated to the Stock Exchanges where the Company's shares are listed, published in the newspapers and displayed along with the Scrutiniser's report on the Company's website viz. www.crisil.com.

In case of any queries, you may refer the Frequently Asked Questions (FAQs) for Shareholders and e-voting user manual for Shareholders available at the download section of www.evoting.nsdl.com or contact NSDL helpdesk by sending a request at evoting@nsdl.co.in or call at toll free no.: 1800 1020 990 and 1800224430 Members may also contact Ms. Pallavi Mhatre, Manager or Mr. Sanjeev Yadav, Assistant Manager, NSDL at the designated email id evoting@nsdl.co.in or SanjeevY@nsdl.co.in or telephone no.:- +91 9324006225. For further assistance, the members can contact Mr. Sridhar Balamurli, Deputy Manager, KFin Technologies Private Limited at einward.ris@kfintech.com or call on toll free no.: 1800 309 4001. The Members may also contact the Company's secretarial department by sending an email to investors@crisil.com or call the Company at +91-22-33423595 should you have any unresolved queries.

For CRISIL Limited

Minal Bhosale
Company Secretary
ACS 12999

Mumbai, August 22, 2021

# क्रिसिल लिमिटेड

CRISIL
An S&P Global Company

**नोंदणीकृत कार्यालय:** क्रिसिल हाउस, सेंट्रल अव्हेन्यू, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई – ४०० ०७६
**सीआयएन:** एल६७१२०एमएच१९८७पीएलसी०४२३६३
**दूरध्वनी:** ०२२–३३४२३०००, **फॅक्स:** ०२२–३३४२३००१
**वेबसाइट:** www.crisil.com; **ईमेल:** investors@crisil.com

## टपाल मतदानासाठी सूचना

सभासदांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४, कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले ८ एप्रिल २०२० रोजीचे सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४ /२०२०, १३ एप्रिल २०२० चे क्रमांक १७ /२०२०, १५ जून २०२० चे क्रमांक २२ /२०२०, २८ सप्टेंबर २०२० चे क्रमांक ३३ /२०२०, ३१ डिसेंबर २०२० चे क्रमांक ३९ /२०२०, १३ जानेवारी २०२१ चे क्रमांक ०२ /२०२१ आणि २३ जून २०२१ चे क्रमांक १० /२०२१ च्या सर्वसाधारण परिपत्रक (सर्व ''एमसीए परिपत्रक'') याच्यासह कंपनी कायदा, २०१३ ; च्या अधिनियम ११० सह सह वाचलेल्या तसेच अन्य लागू असलेल्या तरतुदींसह वैधानिक सुधारणा अथवा त्या तत्काळ अंमलात आणण्यासाठी पुन्हा अंमलबजावणीनुसार क्रिसील लिमिटेड (द ''कंपनी'') श्री. अमिश मेहता यांना एक ऑक्टोबर २०२१ पासून कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्त करण्यासाठी सभासदांची मंजुरी घेत आहे. त्यांच्या नियुक्तीबाबतच्या अटी आणि शर्तींचा उल्लेख १२ ऑगस्ट २०२१ च्या टपाल मतदान नोटीसमध्ये करण्यात आलेला आहे.

नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) आणि सेंट्रल डिपॉझिटरी (इंडिया) लिमिटेड ( सीडीएसएल ) यांच्याकडे नोंदणी झालेल्या ई–मेल आयडीच्या माध्यमातून सभासद सुचीत अथवा लाभधारक मालकांच्या यादीत नाव समाविष्ट असलेल्या सभासदांना कंपनीने २१ ऑगस्ट २०२१ रोजी टपाल मतदान नोटीस पाठविलेली आहे. ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपल्या इमेलची नोंदणी केलेली नाही, त्यांच्या नोंदणीकृत टपाल पत्त्यावर वर उल्लेख झालेल्या परिपत्रकांनुसार कोणतीही गरज नसली तरी एक स्वैच्छिक आदरभाव म्हणून नोटीसची छापील प्रत पाठविलेली आहे. सभासद सुचीत अथवा लाभधारक मालकांच्या यादीत अंतिम मुदतीपर्यंत म्हणजे मंगळवार, १७ ऑगस्ट २०२१ पर्यंत नाव समाविष्ट असलेले सभासदच मतदानासाठी पात्र राहणार आहेत. मतदानाचा अधिकार ग्राह्य धरण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या अंतिम मुदतीपर्यंत म्हणजेच मंगळवार, १७ ऑगस्ट २०२१ पर्यंत जी व्यक्ती सभासद झालेली नसेल, त्यांनी ही नोटीस केवळ माहितीसाठी ग्राह्य धरावी. वर नमूद केलेल्या परिपत्रकांनुसार, टपाल मतदान पत्रिका आणि कामकाज उत्तर लिफाफे सभासदांना पाठवलेले नाहीत. केवळ दूरस्थ ई–मतदान यंत्रणेच्या माध्यमातूनच सभासदांचा होकार अथवा नकार विचारात घेतला जाणार आहे.

डिमटेरियलाइज्ड स्वरुपात समभाग असलेल्या सभासदांना आपल्या ई–मेल पत्यांची संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदणी अथवा अद्ययावतीकरण करण्याची विनंती केली जात आहे. भौतिक स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सभासदांनी आपल्या ईमेल अ‍ॅड्रेसचे अद्ययावतीकरण कंपनी रजिस्ट्रारकडे आणि समभाग हस्तांतर प्रतिनिधी (आरटीए) केफिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे einward.ris@kfintech.com या ई–मेल पत्यावर करण्याची विनंती केली जाते आणि आणि त्याची एक प्रत investors@crisil.com या पत्यावर पाठवावी. आपल्या ई–मेल अ‍ॅड्रेसची नोंदणी करण्यासाठी या सभासदांनी आपला फोलिओ क्रमांक, नाव याच्या उल्लेखासह समभाग प्रमाणपत्राची पुढील आणि मागील बाजू स्कॅन केलेली प्रत, पॅन (स्वयंसाक्षांकित केलेली पॅनकाडची स्कॅन कॉपी), आधार (स्वयंसाक्षांकित केलेली आधार कार्डची स्कॅन कॉपी) या माहितीसह स्वाक्षरी केलेल्या विनंती अर्जाची स्कॅन कॉपी पाठवावी.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ आणि सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ( नोंदणी दायित्व आणि माहिती प्रकटीकरणाची गरज ) नियमावली, २०१५ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम ११० च्या तरतुदींचे अनुपालन करताना, कंपनी आपल्या सभासदांना दूरस्थ ई–मतदानाची सुविधा देत आहे. दूरस्थ ई–मतदानाच्या सुविधेसाठी कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') बरोबर करार केलेला आहे. दूरस्थ ई–मतदानाच्या माध्यमातून मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी समभागधारकांना लॉगिन ओळखपत्रासह टपाल मतदानाची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. दूरस्थ ई–मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्याची सविस्तर प्रक्रिया नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. तसेच याबाबतचा तपशील कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाईल.

दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी मंगळवार, २४ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होणार असून गुरुवार, २३ सप्टेंबर, २०२१ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता संपणार आहे. उपरोक्त कालावधीत सभासद इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आपले मतदान करू शकतात. दूरस्थ ई–मतदानाची सुविधा २३ सप्टेंबर, २०२१ ला संध्याकाळी ५.०० वाजता खंडीत केली जाणार असून या वेळेनंतर दूरस्थ ई–मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

टपाली मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी संचालक मंडळाने कार्यरत कंपनी सचिव श्री मकरंद जोशी यांची छाननीकार म्हणून नियुक्ती केली आहे. टपाली मतदानाचा निकाल शुक्रवारी, २४ सप्टेंबर २०२१ रोजी जाहीर केला जाणार आहे. कंपनीचे समभाग सूचीबद्ध असलेल्या शेअर बाजाराला मतदानाचा निकाल कळविला जाणार आहे, तसेच वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द केला जाणार आहे आणि त्याचबरोबर कंपनीचे संकेतस्थळ www.crisil.com यावर छाननीकाराच्या अहवालासह प्रदर्शित केला जाणार आहे.

जर तुम्हाला कोणताही प्रश्न असल्यास तुम्ही www.evoting.nsdl.com वर समभागधारकांसाठी उपलब्ध केलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) तसेच डाऊनलोड विभागात उपलब्ध केलेल्या ई–मतदान पुस्तिकेचा संदर्भ घेऊ शकतात किंवा evoting@nsdl.co.in येथे विनंतीबाबतचा ई–मेल पाठवून एनएसडीएल हेल्पडेस्कशी संपर्क साधू शकतात किंवा १८०० १०२० ९९० आणि १८००२२४४३० या टोल फ्री क्रमांकावर कॉल करु शकतात. सभासद श्रीमती पल्लवी म्हात्रे, व्यवस्थापक अथवा श्री. संजीव यादव, वरिष्ठ व्यवस्थापक, एनएसडीएल यांच्याशी evoting@nsdl.co.in किंवा SanjeevY@nsdl.co.in या ई–मेलवर संपर्क साधू शकतात किंवा +९१ ९३२४००६२२५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात. अधिक सहाय्यासाठी सभासद श्री. श्रीधर बालमुरली, उपव्यवस्थापक, केफिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी einward.ris@kfintech.com या ई–मेलवर किंवा टोल फ्री क्रमांक १८०० ३०९ ४००१ यावर दूरध्वनी करु शकतात. जर काही प्रश्न अनुत्तरित राहिले असतील, तर सभासद कंपनीच्या सचिवालय विभागाशी investors@crisil.com या पत्यावर ई–मेल पाठवून किंवा कंपनीशी +९१–२२–३३४२३५९५ या दूरध्वनी क्रमांकावर कॉल करुन संपर्क साधू शकतात.

क्रिसिल लिमिटेडसाठी

मिनल भोसले
कंपनी सचिव
एसीएस १२९९९

मुंबई, २२ ऑगस्ट, २०२१